# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३४३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—२१/०६/२०१६.

## १) गैरकायदयाची मंडळी जमवुन मारहान केली. :—

दिनांक २०/०६/२०१६ रोजी ०७.१५ वा. दरम्यान फिर्यादी मोहम्मद आशीफ उकस मोहम्मद मुस्लीम रा. अब्दुल दरगा जवळ कामठी जि. नागपुर यांचे काका हे भंडारा येथे बैलबाजार असल्याने बैल खरेदीसाठी आले होते. परंतु सायंकाळ झाली तरी ते घरी परत आले नाही. फिर्यादी व त्यांच्या घराशेजारी राहणारा त्यांचा मित्र हे दोघेही भंडारा येथे बैलबाजारात चारचाकी वाहनाने आले व त्यांच्या काकांना पाहत असतांना अचानक २० ते २५ लोकांनी गैकायदयाची मंडळी जमवुन लाठया काठया व लोखंडी रॉडने मारून फिर्यादि व त्यांच्या मित्राला जखमी केले. असे फिर्यादीचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,१४७,१४८,१४९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. उबाडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

## २) अज्ञात वाहनाच्या धडकेत आठ वर्षिय चिमुकलीचा मृत्यु व महिला गंभीर जखमी. :—

दिनांक २०/०६/०१६ रोजी ११.४० वा. दरम्यान फिर्यादी टेकराम डल्लुराम साहु वय २९ वर्ष, रा. दत्तरीना टोला जि. राजनांदगाव छत्तीसगढ हे त्यांच्या कुटंबासह नागपुर वरून राजनांदगाव कडे त्यांच्या मोटार सायकल क्र. एमएच ४९ एबी ९६१६ ने जात असतांना भंडारा येथील आरटीओ कार्यालयाजवळ एनएच ६ रोडवर मागुन नागपुर ते भंडाराकडे येणा—या अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने, भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक मारून फिर्यादी यांची मुलगी कु. भारती वय ०८ वर्ष हिच्या मरणास व फिर्यादीच्या पत्नीला गंभीर दुखापत करण्यास कारणीभुत झाला. असे फिर्यादिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादंवी सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. घरडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

## ३) एटीएम कार्ड व्दारे पैसे काढुन फसवणुक केली. :—

दिनांक १९/०६/०१६ रोजी १९.३० वा. ते दि. २०/०६/२०१६ रोजी ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी अतुल सुधाकरराव हाडगे रा. ब्रॉस रेसीडन्सी स्टेशन रोड भंडारा हे जलाराम मंगलकार्यालया जवळील एस.बी.आय. बॅकेच्या एटीएम मधुन पैसे काढण्याकरीता गेले होते. एटीएम मधुन पैसे काढत असतांना तिथे हजर असणा—या अनोळखी आरोपी व्यक्तिने फिर्यादिचे एटीएम कार्ड स्वत:कडे ठेवुन घेतले व त्यांना दुसरे कार्ड देवुन त्यांच्या एटीएम कार्ड मधुन फिर्यादिच्या अकाऊंट मधुन प्रथम २३,०००/—रू. व नंतर २०,०००/—रू. अशे एकुण ४३,०००/—रू. काढुन फसवणुक केली. असे फिर्यादिचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भादंवि सहकलम ६६(क) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सपोनि. किचक पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) चोरी करण्याच्या उद्देशाने बनावट चाबीने ताला खोलुन घरात प्रवेश केला. :—**

दिनांक २०/०६/०१६ रोजी ०६.०० ते ०६.३० वा. दरम्यान फिर्यादी तल्लम साजीद अन्सारी वय ३९ वर्ष, रा. पिएससी वरठी हे त्यांच्या कुटुंबासह बाहेर गेले होते. सकाळी ०६.३० वा. ते घरी परत आले तेव्हा एक अनोळखी इसम त्यांच्या घराच्या कंम्पाऊंड वॉलवरून ऊडी मारून पळुन गेल्याचे त्यांना दिसले व फिर्यादिच्या घरासमोरील दाराचा ताला बनावट चाबीने उघडलेला दिसला. फिर्यादिने दार उघडुन पाहीले तर घरातील सामान अस्ताव्यस्त असुन कोणतेही सामान चोरीला गेलेले नाही. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३८०,४५४,५११ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोना. गभणे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**५) अवैध दारू अडयांवर धाडी. :—**

दिनांक २०/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. साकोली येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २२ लिटर ३२० मि.ली. देशी दारू कि. ५,९४०/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

O/C

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.